**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ५**

दिनांक :- १७/०७/२०१३ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची **मासिक सभा** बुधवार दिनांक १७/०७/२०१३ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ४. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ५. | मा. मोरेश्वर महादू भोंडवे | सदस्य |
| ६. | मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव | सदस्य |
| ७. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ८. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ९. | मा. †›.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| १०. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| ११. | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| १२. | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| १३ | मा. गावडे जयश्री वसंत | सदस्य |
| १४. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| १५. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | सदस्य |
| १६ | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १७. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १८. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १९. | मा. मंचरकर गिता सुशिल | सदस्य |
| २०. | मा. कदम कैलास महादेव | सदस्य |
| २१. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| २२. | मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव | सदस्य |
| २३. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य. अभियंता रविद्र दुधेकर, शरद जाधव, रामदास जाधव, वसंत काची, जयंत बरशेट्टी, प्रशासन अधिकारी शांताराम राऊत, लेखाधिकारी सुरेश आव्हाळे, उपअभियंता, बागलाणे संजय, डी. एन. गट्टूवार, सी.बी. कोंडे, के. डी. फुटाणे, व्हि. जी कांबळे, व्ही.एन.देसले, के.एस. महाजन, संजय घुबे, श्रीम. मोमीन, एम.एम.चव्हाण सहा. आरोग्याधिकारी जे.एस. जानकर, उदयान - चांदेरे आर. बी., पशुवैद्यकिय डॉ. गोरे इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

प्रशासन अधिकारी (सभाशाखा) ब प्रभाग समिती यांनी विषयपत्राचे वाचन केले.

**उपस्थित सन्मा सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र. १ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. १९ मधील किवळे येथील स्मशानभुमी दुरुस्तीबाबत.

विषय क्र. २ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. ४३ मधील फुटपाथवर (जिजामाता रग्णालय परिसर) रेलिंग लावणेबाबत.

विषय क्र. ३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

चिंचवड लिंकरोड हिंदू स्मशानभुमीत पत्राशेड बांधणे.

विषय क्र. ४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

रेलिंग लावणेबाबत.

विषय क्र. ५ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पक्षांना चारा व पाणी यांची सोय करण्यासाठी प्रभाग क्र. २३, केशवनगर येथे ४ ते ५ फुटाचे चौथरे दोन ठिकाणी उभे करावेत.

विषय क्र. ६ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

हायमास्ट दिवे बसविणेबाबत.

विषय क्र. ७ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

चौथरा बांधणेबाबत.

विषय क्र. ८ विभाग : विद्युत विभाग, ब प्रभाग

ब प्रभाग कार्यालय विद्युत विभागाचे हायड्रॉलिक वाहन भाडे तत्वावर पुरविणे या लेखाशिर्षासाठी तरतूद वर्ग करणेबाबत.

ठराव क्र. ३० विषय क्र. १

दि. १७/०७/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. भोंडवे संगिता राजेंद्र अनुमोदक: मा. तरस बाळासाहेब जयवंत

संदर्भ : मा. भोंडवे संगिता राजेंद्र यांचे दि. १७/०७/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. १९ मधील किवळे येथे पत्र्याचे स्मशानभुमी असून त्याच्या शेडचे पत्रे तुटलेले असुन पाणी गळती होते. भविष्यात अपघात होणेची शक्यता आहे. सदरबाबत कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ३१ विषय क्र.२

दि. १७/०७/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव अनुमोदक: मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन

संदर्भ : मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव यांचे दि. १७/०७/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

जिजामाता रुग्णालय परिसरातील तसेच साधु वासवानी गार्डन परिसरातील फुटपाथला तसेच इतर ठिकाणी रेलिंग लावण्यास मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ३२ विषय क्र. ३

दि. १७/०७/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक: मा. शमीम पठाण अनुमोदक: मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन

संदर्भ : मा. शमीम पठाण यांचे दि. १७/०७/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

चिंचवड लिंकरोड येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी आलेल्या नागरिकांना बसण्यासाठी ओटा व पत्राशेडची आवश्यकता आहे. पत्राशेड ओटा त्वरित बांधण्यात यावा. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदरची कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ३३ विषय क्र. ४
दि. १७/०७/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक: मा. शमीम पठाण अनुमोदक: मा. नेटके सुमन राजेंद्र
संदर्भ : मा. शमीम पठाण यांचे दि. १७/०७/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. २१ मधील टेल्को कंपनी गेट पासून भोईरनगर चौकापर्यंत फुटपाथला रेलींग करण्यास मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ३४ विषय क्र. ५
दि. १७/०७/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक: मा. को-हाळे अनंत सुभाष अनुमोदक: मा. ओव्हाळ शेखर अशोक
संदर्भ : मा. को-हाळे अनंत सुभाष यांचे दि. १७/०७/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पक्षांना चारा व पाणी यांची सोय करण्यासाठी प्रभाग क्र. २३, केशवनगर येथे ४ ते ५ फुटाचे चौथरे दोन ठिकाणी उभे करण्यास मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ३५ विषय क्र. ६
दि. १७/०७/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक: मा. शमीम पठाण अनुमोदक: मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन
संदर्भ : मा. शमीम पठाण यांचे दि. १७/०७/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र.२२ मधील खालील चौकात व कोप-यावर हायमास्ट दिवे बसवावेत.

१. संतोषनगर १, लोकमान्य हॉस्पिटल जवळ – १
२. उद्योगनगर मध्ये सर्व कोप-यावर ६ ठिकाणी
३. दळवीनगर मधील विविध कोप-यावर ४ ठिकाणी
४. पांढारकरचाळ ३ ठिकाणी
५. खैरे हॉस्पिटल जवळ १
६. कामिनी हॉटेल १ एस. के. एफ. कॉलनीत ३ ठिकाणी

याशिवाय आवश्यक तेथे हायमास्ट दिवे बसविणेस मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ३६ विषय क्र. ७
दि. १७/०७/२०१३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक: मा. गावडे जयश्री वसंत अनुमोदक:मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख
संदर्भ: मा. गावडे जयश्री वसंत यांचे दि. १७/०७/२०१३ रोजीचे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र.२४ मधील पिं.चिं.लिंक रोड वरुन दरवर्षी महासाधु मोरया गोसावींची पालखी प्रस्थान करीत असते. तसेच विसाव्यासाठी लिंक रोडवरील दुर्गा कॉर्नर येथे थांबते. त्यासाठी दरवर्षी रस्ते खोदून स्टेजची व्यवस्था करावी लागते. तसेच तेथे लोकांची दर्शनासाठी बरीच गर्दी असते.

त्यामुळे सदर पालखी विसाव्याकरीता दुर्गा कॉर्नरमागील महापालिकेच्या जागेत चौथरा बांधणेस मान्यता देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ३७ विषय क्र. ८

दि. १७/०७/२०१३ विभाग : विद्युत विभाग, ब प्रभाग

सुचक:मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख अनुमोदक:मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन

संदर्भ :क्र.बप्र/वि/जा/४७६/२०१३, दि.१२/०७/२०१३ दिनांकाचे पत्र.

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

ब प्रभाग कार्यालय विद्युत विभागाचे हायड्रॉलिक वाहन भाडेतत्वावर पुरविणे यालेखाशिर्षासाठी तरतूद वर्ग करणेबाबत.

ब प्रभाग विद्युत विभागाचे सन २०१३-१४ महसुली अंदाजपत्रकातील खालील नमूद केलेल्या कामासाठी करण्यात आलेली तरतूद मिळाली नाही. त्यामुळे माहे एप्रिल २०१३ पासून दिवाबत्ती देखभाल व दुरुस्तीचे कामाकरीता वापरणेत आलेल्या हायड्रॉलिक वाहनाचा खर्च संबंधित एजन्सीस अदा करता आला नाही. सदरची कामे पुर्ण करण्याकरीता आवश्यक तरतूद खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे वर्ग करणे शक्य आहे.

**तक्ता क्र. १.**

| **अ.क्र** | **कामाचे नांव** | **अंदाजपत्रक पानांक व लेखाशिर्षक** | **सन २०१३-१४ साठी असलेली तरतूद** | **एकूण तदतूदीपेक्षा जादा वर्ग करावयाची रक्कम** | **अंदाजपत्रकातील ज्या कामावरुन तरतूद वर्ग करावयाची आहे त्याचा पानांक व अ.क्र.** | **वर्ग करावयाची रक्कम** | **तरतूद वर्ग केलेनंतर सन २०१३-१४ साठी होणारी एकूण तरतूद** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हायड्रॉलिक वाहन भाडेतत्वावर पुरविणे | पान क्र. १०१ – ११० अ.क्र. - ०९ | ० | १५०००००० | पान क्र. ८१-९० अ.क्र.०६ मनपाने द्यावयाची विज बिले व खर्च व नवीन विज मिटर | १५०००००० | १५०००००० |

वर नमूद केलेल्या कामासाठी ज्या कामावरुन तरतूद वर्ग करणे शक्य आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

**तक्ता क्र. २**

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **सन २०१३-१४ साठी असलेली तरतूद** | **पानांक व अ.क्र.** | **तरतूद वर्ग केल्यानंतर प्रत्यक्ष राहिलेली रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | मनपाने द्यावयाची विजबिले व खर्च व नवीन विज मिटर | १०००००००० | पान क्र. ८१ - ९० अ.क्र.०६ | ८५०००००० |

वर नमूद केलेल्या तक्ता क्र. २ मधील कामांकरीता सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात तरतूदीची आवश्यकता नसल्याने वरीलप्रमाणे विद्युत विभागाचे सन २०१३ - १४ चे अंदाजपत्रकातील ब प्रभाग विद्युत विभागांतर्गत लेखा शिर्षामधून तरतूद वर्ग करणे शक्य आहे.

सबब उपरोक्त तक्ता क्र. १ मध्ये नमूद कामाकरीता तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे तरतूद वर्ग करणे आवश्यक असल्याने व तक्ता क्र. २ मध्ये नमूद कामांकरीता सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात तरतूद लागणार नसल्याने तक्ता क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विद्युत विभागाचे सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील ब प्रभाग विद्युत विभागांतर्गत लेखा शिर्षामधून तरतूद वर्ग करणेकामी मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्षा मा. पवार यमुनाताई रमणनाना यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
[ पवार यमुनाताई रमणनाना ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रति,
सर्व संबंधित

प्रशासन अधिकारी
सभाशाखा, ब प्रभाग समिती
पि.चिं.मनपा, चिंचवड-३३.

क्र. एएमसी/बप्र२/कावि/२६६/२०१३, दि.१२/०८/२०१३